यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत ग्रामपंचायत मेंढला (धनगरवाडी), ता. कळंब, जि. यवतमाळ येथील दोन वसाहत प्रकल्पास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग
शासन निर्णय : यचमु-२०१८/प्र.क्र.११९/विजाभज-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१९.

संदर्भ : १) शासन निर्णय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र.गृनियो-२०१७/प्र.क्र.६०/ विजाभज-१, दिनांक २४/१/२०१८.
२) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. जा.क्र.विजाभजस/यचमुवयो/यवतमाळ/२०१८/१५७, दिनांक १८/१/२०१९.

शासन निर्णय :-

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत ग्रामपंचायत मेंढला (धनगरवाडी), ता. कळंब, जि. यवतमाळ येथे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात प्रत्येकी २० कुटुंबाच्या एका वसाहतीला मान्यता देण्याबाबत संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र संचालनालय, पुणे यांनी त्यांचे संदर्भ क्रमांक २ येथील दिनांक १८/१/२०१९ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन कळविण्याचे आदेश आहे की, संदर्भ क्रमांक १ येथील दिनांक २४/१/२०१८ च्या शासन निर्णयान्वये विमुक्त जाती व भटक्या जमाती या समाजातील घटकांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत केलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने सन २०१८-१९ या वर्षात ग्रामपंचायत मेंढला (धनगरवाडी), ता. कळंब, जि. यवतमाळ येथील प्रत्येकी एका वसाहतीकरीता २० घरे व अन्य बाबींसाठी सार्वजनिक बांधकाम उप विभाग कळंब, जि. यवतमाळ यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार प्रत्येकी रुपये ८८.६३ लक्ष इतक्या खर्चास या ज्ञापनान्वये खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१) जिल्हास्तरीय समितीने पात्र ठरवलेल्या व छाननी अंती अंतीम केलेल्या लाभार्थी कुटुंबास सदरहू योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.
२) सर्व लाभार्थ्यांची जात प्रमाणपत्रे फक्त विजाभज प्रवर्गाची असणे बंधनकारक राहील.
३) ज्या व्यक्तीचे जात प्रमाणपत्र आहे. त्याच व्यक्तीस सदरहू योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. दुसऱ्या व्यक्तीस त्याचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.
४) उत्पन्नाचे दाखले हे सन २०१७-१८ किंवा सन २०१८-१९ या वर्षाचे सादर करणे आवश्यक राहतील.
५) सर्व लाभार्थींना आदेशाच्या दिनांकापासून एका महिन्यात अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

६) ज्या व्यक्तीच्या नावात, पालकाच्या / वडीलांच्या नावात अथवा आडनावात तफावत असल्यास ती तफावत दुर करण्यासाठी संबंधित व्यक्तीच्या नावाचा, पालकाच्या नाव व आडनावाचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.

७) ज्या व्यक्तीच्या नावात, पालकाच्या / वडीलाच्या नावात किंवा आडनावात तफावत असेल अशा व्यक्तीस सदरहू योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

८) जिल्हास्तरीय समितीने शासन निर्णय दिनांक २४/१/२०१८ च्या शासन निर्णयाच्या अधीन राहून सदरहू प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन सदरहू वसाहतीस मान्यता देण्याची कार्यवाही करणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत शासन निर्णयातील अटी व शर्तीचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२. या प्रकरणी लाभार्थ्यांच्या सर्व कागदपत्रांची व अटींची पुर्तता झाल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी ही जिल्हाधिकारी, यवतमाळ, प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, अमरावती व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, यवतमाळ यांची राहील.

३. या वसाहतीतील २० कुटूंबाकरीता इतर मुलभूत सोयी सुविधांसाठी एका वसाहतीकरीता शासन निर्णय दिनांक २४/१/२०१८ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार कमाल मर्यादेत खर्च करणे अनुज्ञेय राहिल. याकरीता कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त निधी मंजूर केला जाणार नाही.

४. सदरहू योजनेच्या अंमलबजावणीसाठी संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे हे आहरण व संवितरण अधिकारी असतील. सदरहू योजनेसाठी आवश्यक असलेल्या प्रती वसाहत (२० कुटुंबे) रुपये ८८.६३ लक्ष एवढी तरतूद संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे हे संबंधित यंत्रणेस वितरीत करतील. संबंधित जिल्हाधिकारी, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण यांनी सर्व अटी व शर्तींच्या पुर्ततेशिवाय निधी खर्च करु नये.

५. याबाबतचा खर्च सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात मागणी क्र.एन-३, मुख्य लेखाशिर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग याचे कल्याण, ०३ मागासवर्गाचे कल्याण, (०१)(०३) विमुक्त जाती भटक्या जमातीसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना (२२२५-डि-२४२) ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखालील तरतूदीतून भागविण्यास आणि शासन निर्णय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र.गृनियो-२०१७/प्र.क्र.६०/विजाभज-१, दिनांक २४/१/२०१८ मध्ये नमूद करण्यात आलेल्या सूचनेनुसार खर्च करण्यास या ज्ञापनाद्वारे शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०२२६११५१४११५२२ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.02.26 11:53:44 +05'30'

(भा. र. गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १./२, मुंबई/नागपूर.
४) जिल्हाधिकारी, यवतमाळ.
५) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे.
६) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, अमरावती.
७) सहायक आयुक्त, समाजकल्याण, यवतमाळ.
८) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ.
९) निवासी लेखा परिक्षक, मुंबई.
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११) जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई.
१२) कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प) विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) निवड नस्ती (विजाभज-१).